दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २८२ • RNI : MAHMAR/2023/87818 • रविवार दि.२१ जुलै २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Scan QR code to visit... Epaper Portal

Scan QR code to visit... Epaper Portal

# वाघनखे म्हणजे महाराष्ट्राची शान-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## वाघनखांवरून राजकारण करणे हा शिवरायांचा पराक्रमाचा अपमान

**सातारा (वृत्तसंस्था)-छत्रपती शिवरायांची 'वाघनखं' आजपासून साताऱ्यात प्रदर्शनासाठी ठेवण्यात आली आहेत. प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर लंडनच्या व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट वस्तुसंग्रहालयातून ही वाघनखे महाराष्ट्रात पोहोचली आहेत. या वाघनखांसह शिवकालीन शस्त्रांचे देखील प्रदर्शन केले जाणार आहे.मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी याबाबत राज्याच्या पावसाळी अधिवेशनात घोषणा केली होती. यावेळी सोहळ्याला येताच मुख्यमंत्री शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी शिवरायांना अभिवादन केले. तसेच तिथे उपस्थित महिलांनी या तिघांना राखी बांधली. यावेळी शिंदे, फडणवीस, पवारांच्या हस्ते वाघनखांसह इतर शस्त्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन पार पडले. शिवकालीन वाघनखांची पहिली झलक यावेळी समोर आली आहे.या क्षणाची आतुरतेने वाट पाहत होतो. तो क्षण आला असून हे फक्त वाघनखांचं दर्शन होणार नसून शिवप्रेमींना छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचं दर्शन होणार आहे.**

आज आम्ही येथे केवळ छत्रपतींचे मावळे म्हणून या सातारानगरीत आलो आहोत. सुधीर मुनगंटीवारांनी लंडनमध्ये जाऊन याचा एमओयू करून ही वाघनखे सातारानगरीत आणली. वाघनखे वेळेवर महाराष्ट्रात आणल्यामुळे सुधीर मुनगंटीवार यांचे आभारही देवेंद्र फडणवीस यांनी मानले आहेत.शिवरायांचे ही वाघनखे राज्यात आणल्याबद्दल सर्वांमध्ये स्फुर्ती आली पाहिजे. परंतु काही लोकांना या अशा घटनांना गालबोट लावायचं, राजकारण करायचं असतं. वाघनखांवर आक्षेप घेणं म्हणजे शिवाजी महाराजांच्या शौर्याचा, वीरतेचा, पराक्रमाचा, शूरतेचा अपमान केल्यासारखे आहे. हा अपमान शिवप्रेमी कदापीही सहन करणार नसल्याचेही एकनाथ शिंदे यावेळी बोलतांना म्हणाले. १० नोव्हेंबर १६५९ चा तो दिवस होता. ज्या दिवशी छत्रपती शिवाजी महाराज यांनी अफजल खानाचा कोथडा बाहेर काढला होता. हिंदवी स्वराज्य स्थापनेतील ही सर्वात मोठी घटना होती. आज या पराक्रमाचा एक एक घटनाक्रम डोळ्यासमोर उभा राहत असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. भारतीय नौदलाच्या ध्वजावर शिवाजी महाराजांची राजमुद्रा ही निशाणी दिल्याचा उल्लेखही शिंदे यांनी केला.यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, आजचा दिवस अत्यंत महत्वाचा आहे. काही चांगले



होत असेल तर काही जण त्यात खोडा घालण्याचा प्रयत्न करतात. टीका करणाऱ्यांपैकी अनेक जण लंडनमध्ये कोहिनुर हिरा पाहतात फोटो काढून टाकतात. मात्र आज महाराष्ट्रात मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने ही वाघनखे आणण्यात आली आहेत असे म्हणत अजित पवारांनी विरोधकांना टोला लगावला आहे.यावेळी शिंदे म्हणाले, अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर हा दिवस आला आहे. हा सर्वांसाठी अभिमानाचा दिवस आहे. शिवरायांची वाघनखे हे शौर्याचे प्रतीक आहे त्याचे दर्शन शिवभक्तांना घेता येणार आहे. तसेच खोट्या वाघनखांना खऱ्या वाघनखांची काय समज असणार असा टोला शिंदेंनी विरोधकांना लगावला आहे. विरोधकांकडून सातत्याने ही खोटी वाघनखे असल्याची टीका केली जात आहे.यावेळी ओपन जीपमधून शिंदे, फडणवीस आणि पवार संग्रहालयाकडे पोहोचले. महायुतीचे मोठे शक्तिप्रदर्शन पाहायला मिळाले. तसेच शिवभक्तांकडून घोषणाबाजी देखील करण्यात आली. ओपन जीपमधून जात असताना मुख्यमंत्री शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. सातारकरांचे अभिवादन स्वीकारत महायुतीचा रोड शो पार पडला.सोहळ्यात बोलतांना मंत्री शंभूराज देसाई म्हणाले, लंडनहून ही वाघनखे येणे ही अभिमानाची बाब आहे. मात्र इतके दिवस ही वाघनखे लंडनला आहेत असे आपण ऐकत आलो. ती वाघनखे प्रत्यक्ष पाहण्याची संधी महायुती सरकारने मिळवून दिली. ज्यांना हे करायचे नव्हते ते म्हणत आहेत की ही वाघनखे वाजतगाजत का आणली नाहीत. मात्र ब्रिटनच्या प्रतिनिधींकडून काही नियम लेखी देण्यात आले होते. ते नियम सरकारने मान्य केले आहे. त्यामुळे हे नियम मोडले तर हे वाघनखे ते माघारी घेऊन जाऊ शकतात. शिंदेंनी कायम ही वाघनखे साताऱ्यात आणण्यासाठी प्रयत्न केले आहेत. सात महिने ही वाघनखे इथे लोकांसाठी खुली राहणार आहेत.मंत्री सुधीर मुनगंटीवार यावेळी म्हणाले, आजचा दिवस हा शिवप्रेमींसाठी गौरवाचा दिवस आहे. अफजलखानाचे उदात्तीकरण महाराष्ट्रात होत होते. अफजलखानाच्या कबरीचे अतिक्रमण हटवण्यात आले. यापुढे छत्रपतींचा राज्याभिषेक हा सरकारी कार्यक्रम होईल असा निर्णय राज्याच्या अधिवेशनात घेण्यात आला होता. अयोध्येत जे बांधकाम झाले ते महाराष्ट्राच्या लाकडांपासून झाले. शिवरायांची शिवसृष्टी संसद भवनात तयार करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.





## थोडक्यात

### आमदार होताच पंकजा मुंडे लागल्या कामाला

**मुंबई**-भाजपच्या राष्ट्रीय सचिव तथा नवनिर्वाचित विधान परिषद सदस्य आमदार पंकजा मुंडे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन परळी आणि बीड जिल्ह्यातील रेल्वेच्या समस्या त्यांच्या समोर मांडल्या. परळीतील जमीन अधिग्रहणासह जिल्ह्यातील रेल्वेविषयक प्रश्नांची लवकरच सोडवणूक करू असे आश्वासन त्यांनी दिले. जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांची देखील यावेळी उपस्थित होती.भाजपच्या कोअर कमिटीच्या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी केंद्रीय रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव गुरूवारी मुंबईत आले होते. भाजपच्या प्रदेश कार्यालयात आमदार पंकजा मुंडे, पालकमंत्री धनंजय मुंडे आणि परळीच्या शिष्टमंडळाने त्यांची भेट घेतली. परळी येथील रेल्वेच्या जमीन अधिग्रहणासह विविध मागण्यांचे निवेदन यावेळी त्यांना देण्यात आले. पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांनी सविस्तरपणे सगळे विषय त्यांचेसमोर मांडले.या सर्व मागण्यांवर योग्य तो विचार करून परळी वैजनाथ, बीड येथील रेल्वेचे रखडलेले प्रश्न त्वरीत मार्गी लावण्यासाठी मी प्रयत्नशील आहे, असा विश्वास केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी या वेळी दिला. दरम्यान, या भेटीत सुरवातीला पंकजा मुंडे यांनी अश्विनी वैष्णव यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत निरोगी आणि उदंड दीर्घायुष्य लाभावे अशी सदिच्छा व्यक्त केली.

### फालतू बडबड करायला मी मोकळा नाही

**पुणे**-महायुतीचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण असा प्रश्न विचारताच उपमुख्यमंत्री अजित पवार चांगलेच भडकले. असली फालतू बडबड करायला मी मोकळा नाही मला गरिबी, विकास याबाबत विचारत जा, असे पुण्यात अजित पवारांनी माध्यमांशी संवाद साधताना म्हटले आहे. भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी या तीन पक्षांच्या नेत्यांच्या नेतृत्त्वाखाली आगामी विधानसभा निवडणूक लढवली जाणार आहे. मुख्यमंत्रिपदासंदर्भात काहीही काळजी करू नका. या राज्याला मुख्यमंत्री दिला जाईल, असे अजित पवारांनी म्हटले आहे.अजित पवार पुढे बोलताना म्हणाले की, मी कामाचा माणूस आहे. तुम्ही सगळे अंथरूणात असताना माझी सकाळी सात वाजता बैठक चालू झाली होती.याच कारणामुळे मी तुमच्याशी बोलत नाहीत. असली फालतू बडबड करायला मी मोकळा नाही. मी फक्त सांगतोय. त्यामुळे मला फक्त विकासाबाबत, गरिबीबाबत प्रश्न विचारा, अशी नाराजी अजित पवार यांनी व्यक्त केली.राष्ट्रवादीच्या कार्यक्रमाच्या ठिकाणी आणि तुम्ही जॅकेट सुद्धा गुलाबी रंगाचे वापरत आहात? याबद्दल प्रसारमाध्यमाच्या प्रतिनिधीने प्रश्न विचारल्यावर अजितदादा म्हणाले, तुला काही त्रास होतोय का? मला व्यक्तिस्वातंत्र्य आहे.

### राज्यात शेतीच्या योजनेत ११८ कोटींचा घोटाळा

**मुंबई**-राज्यात शेतीच्या योजना मध्ये ११८ कोटींचा घोटाळा झाल्याचा पुरावे संघाच्या जेष्ठांनी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे दिले त्याचे काय झाले याचे उत्तर फडणवीस यांनी द्यावे असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आज पैठण मध्ये व्यक्त केले. त्या पैठण येथे गुणवंतांचा सत्कार व मेळाव्यानिमित्त आल्या होत्या. माजी आमदार संजय वाघचौरे यांनी आयोजित केलेल्या गावनिहाय शेतकरी, शेतमजूर जनसंपर्क अभियानाला खासदार सुळे, फौजिया खान, राजेश टोपे, महेबुब शेख, पांडुरंग तायडे, उमेश पंडुरे, विशाल वाघचौरे, ज्ञानेश्वर कापसे यांच्या उपस्थित प्रारंभ झाला. पुढे बोलताना खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या की, आम्ही लोकसभेच्या निकालानंतर तात्काळ विधानसभेची तयारी सुरू केली आहे. आमच्या पक्षाचे चिन्ह, नाव चोरून घेऊन गेले मात्र याच संघर्षातून नव्याने आम्ही उभे राहत आहोत. नुकतेच संघाच्या वरिष्ठानी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे दिले. मात्र देवेंद्र फडणवीस यांनी याचे उत्तर अद्याप दिले नाही. हिम्मत असेल तर त्यांनी ते सांगावे असे फडणवीस यांना त्यांनी आवाहन केले.भाजपचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची स्तुती करत ते चांगले काम करतात असे सांगितले.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेची प्रभावी अंमलबजावणी करा

### जिल्हाधिकाऱ्यांचे शासकीय विभाग, उद्योग व आस्थापनांना निर्देश



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शासनाने राज्यातील युवकांसाठी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' नुकतीच जाहीर केली आहे. या योजनेंतर्गत शासनामार्फत शैक्षणिक अर्हता १२ वी पास करीता प्रतिमाह ६ हजार रुपये विद्यावेतन, आय.टी.आय/पदविकाधारकास प्रतिमहा ८ हजार रुपये तर पदवीधर/पदव्युत्तर उमेदवारास प्रतिमहा १० हजार याप्रमाणे पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात दरमहा विद्यावेतन जमा करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळण्यासाठी सर्वांनी सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिले आहे.

शासनाने दिलेल्या विद्यावेतन व्यतिरिक्त प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन देण्याची मुभा आस्थापना व उद्योगांना राहणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व शासकीय- निमशासकीय कार्यालये, सहकारी संस्था, कंपनी, लघु, मध्यम व मोठे उद्योग, स्टार्टअप व विविध आस्थापनांनी मनुष्यबळाची ऑनलाईन मागणी त्वरीत नोंदविण्यासाठी जिल्हाधिका-यांच्या स्वाक्षरीचे पत्रसुध्दा सर्व विभागांना आणि विविध आस्थापनांना पाठविण्यात आले आहे .

# मागणीला यश: बहुजन विद्यार्थ्यांसाठी परदेशी शिक्षण शिष्यवृत्तीच्या नवीन जाचक अटी रद्द

## आमदार किशोर जोरगेवार यांनी केली होती मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आमदार किशोर जोरगेवार यांच्या मागणीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीय (बहुजन) विद्यार्थ्यांसाठी परदेशी शिक्षणासाठी शासनाकडून पुरवण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये घालण्यात आलेल्या नवीन जाचक अटी रद्द केल्या आहेत. त्यामुळे अनेक बहुजन विद्यार्थ्यांचा आता परदेशी शिक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे. अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासनाकडून देण्यात येणाऱ्या परदेशी शिष्यवृत्तीमध्ये 'समान धोरणा'च्या नावाखाली जाचक अटी घातल्या होत्या. दहावी, बारावी आणि पदवीला ७५ टक्के गुणांची अट घालतानाच शिक्षण शुल्काला ३० ते ४० लाखांची मर्यादा घालून दिली होती. यामुळे परदेशी शिक्षणाचे स्वप्न पाहणाऱ्यांचे पंख छाटले गेल्याचा आरोप होत होता. राज्य शासनाने आता या सर्व अटी मागे घेतल्या असून पदवीमध्ये ५५ टक्के गुण घेणाऱ्या विद्यार्थ्याला परदेशी



शिष्यवृत्ती चा लाभ घेता येणार आहे. तसेच विदेशी विद्यापीठांमध्ये असणारे सर्व शुल्क आता राज्य सरकार भरणार आहे. त्यामुळे शुल्काला लावलेली मर्यादा मागे घेण्यात आली आहे. सरकारच्या या निर्णयामुळे बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

यापूर्वी परदेशी शिष्यवृत्तीच्या लाभार्थींचा संपूर्ण खर्च हा शासनाकडून उचलला जात होता. पण अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी आलेल्या जाहिरातीनुसार, आता पदवी आणि पदविका अभ्यासक्रमासाठी वार्षिक ३० लाख, तर पीएच.डी.साठी ४० लाख रुपयांची मर्यादा घालून देण्यात आली होती. यापूर्वी विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क वगळून वार्षिक १२ लाख रुपये निर्वाह भत्ता दिला जात होता, परंतु आता ३० आणि ४० लाखांमध्येच निर्वाह भत्ताही मोजला जाईल. पूर्वी एका कुटुंबातील दोन विद्यार्थी परदेशी शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेऊ शकत होते. आता केवळ एक विद्यार्थीच लाभ घेऊ शकणार होता. त्यामुळे या जाचक अटी रद्द करण्याची मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेत केली होती. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांची मुख्यमंत्री यांच्यासह सकारात्मक चर्चा झाली होती. त्यानंतर शासनाच्या वतीने आता सदर जाचक अटी रद्द करण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता परदेशी शिष्यवृत्ती ही पूर्वीप्रमाणे सुरू राहणार आहे. यात केवळ आठ लाख उत्पन्न मर्यादेची अट कायम ठेवण्यात आली आहे. मागणीची दखल घेत बहुजन विद्यार्थ्यांना दिलासा देणारा निर्णय घेतल्याबद्दल आमदार किशोर जोरगेवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले आहेत.

# साखरा-आब वडगाव कोरा या मार्गावरील अनेक गावाचा संपर्क तुटला


## पुलाला लावलेल्या सीडीवरुन नागरिक करतात ये-जा

**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील साखरा -आब वडगाव ते कोरा जाणाऱ्या मार्गावर पुलाचे काम संबंधित ठेकेदाराने वेळेवर पूर्ण न केल्यामुळे व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निष्काळजीपणामुळे पुलाचे काम अर्धवट राहिले आहे.नागरिकांना जाण्या येण्यासाठी रस्ताच नसल्यामुळे पुलाला लावून असलेल्या सीडी वरुन पूल पार करून शेतकऱ्यांना आपल्या शेतात जावे लागत आहे.

मुसळधार पाऊस येत आहे परंतु जाणे येणेसाठी अर्धवट पूल अड्सर ठरला आहे. यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग आणि ठेकेदार जबाबदार असल्याचा आरोप साखरा ग्रा. प. चे माजी सरपंच तथा विद्यमान ग्रा. प. सदस्य दिनेश मोहारे यांनी केला आहे.

मुसळधार पाऊस येत असून रस्त्यांची व पुलांची स्थिती दयनीय झाली आहे . ग्रामीण भागात आरोग्य व्यवस्था नसते त्यामुळे साखरा, आब वडगाव येथील नागरिकांना शेगाव,वरोरा, चंद्रपूर या ठिकाणी उपचारासाठी तसेच जीवनावश्यक वस्तू खरेदीसाठी सुद्धा जावे लागते तसेच शाळेच्या मुलाना शाळेत जाण्या करीता कोणताही पर्याय मार्ग नसल्याने शिक्षण बंद आहे .अनेक गावांना रहदारीसाठी जोडणारा रस्त्यावरील पुलाचे काम ठेकेदाराने निर्धारित वेळेत पूर्ण न करता अर्धवट बांधकाम केले आहे. त्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. वरिष्ठ प्रशासनाने या गंभीर समस्याकडे लक्ष देऊन उपाययोजना करावी अशी मागणी होत आहे.






# ।।कालेन गच्छे गरुनं सकासं। थंभं निरंकत्वा निवातवुत्ति।।

**गुरूदर्शन व गुरूपूजा करण्याच्या हेतूने आषाढ महिन्यातील पौर्णिमेच्या तिथीला गुरुपौर्णिमा आणि व्यास पौर्णिमा म्हटले जाते. वेद व्यास यांना प्रथम गुरुचा दर्जा देण्यात आलेला आहे, कारण त्यांनी संपूर्ण मानव जातीला चार वेदांचे ज्ञान दिले आहे. गुरु म्हणजे अज्ञानाचा अंधकार नाहीसा करून ज्ञानाच्या, प्रकाशाच्या वाटेकडे घेऊन जाणारी वंदनीय व्यक्ती होय. सदर माहितीपूर्ण व ज्ञानवर्धक लेख श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी ईशभक्तांच्या चरणी समर्पित करताहेत... संपादक.**

गुरूपौर्णिमा हा भारतातील एक महत्त्वाचा सण आहे. भारतीय संस्कृतीत गुरूला देवापेक्षाही श्रेष्ठ मानले जाते. कारण सद्गुरू हेच परमात्म्याचे सगुण साकार रुप असते. म्हणूनच गुरुपौर्णिमेला गुरुपूजन केले जाते. भारतात गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात आणि श्रद्धापूर्वक साजरी केली जाते. गुरूपुजेला सर्वच धर्मात अनन्यसाधारण महत्त्व सांगितले आहे. बौद्ध धम्मात तर हजारो वर्षांपासून गुरूपुजेला विशेष स्थान दिलेले आढळून येते. गुरूचा अर्थच अगदी मस्तकात लखख प्रकाश पाडणारा प्रतित होतो. गु म्हणजे काळोख तर रू म्हणजे प्रकाशपुंज होय. सद्गुरु लाभला तर ईश्वरप्राती झाली आणि गुरुला पुजता परमेश्वर प्रसन्न झालाच म्हणून समजा. तेव्हा आपल्या तोंडून श्लोक बाहेर पडतोच-



गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः। गुरु साक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः।।

हिंदू धर्मात तसे तर सगळ्या पौर्णिमा त्याच्या त्याच्या खास महत्वांनी परिचीत आहेत. या दिवशी पवित्र नद्यांमध्ये स्नान केले जाते आणि होम, जप, तप, दान, धर्म यांसाठी खास तिथी मानली जाते. गुरुमंत्र प्राप्त करण्यासाठी देखील हा दिवस फार महत्वाचा ठरतो. या दिवशी आपण ज्यांना आपला गुरु मानतो त्यांचा आदर करावा आणि त्यांना नमस्कार करावा. कारण त्यांनी दिलेल्या ज्ञानातून आपल्या जिवनातला अंधकार नष्ट झालेला असतो आणि गुरुद्वारे भगवंताची प्राप्ती होते. गुरुंनी दिलेल्या ज्ञानाच्या भंडारातूनच आपण जिवनातील प्रत्येक मार्गावर यशस्वीपणे वाटचाल करतो. प्राचीन काळापासून ते आतापर्यंत गुरु-शिष्यांची ही परंपरा सुरू आहे. या दिवशी फक्त गुरुंनाच नव्हे तर घरातील प्रत्येक ज्येष्ठ सदस्य, आईवडील आणि आपल्या जीवनात कठीण काळात साथ देणाऱ्या प्रत्येकाला गुरुचा दर्जा देत त्यांचे आभार मानावे, त्यांना नतमस्तक व्हावे. सन्मार्ग आणि परमार्थ प्राप्तीचा गुरोपदेश करताना तथागत गौतम बुद्ध किसीलसुत्तात म्हणतात, की गुरुभेटीचा क्षण जाणा व संधी न गमावता आदरपूर्वक गुरूमुखातून येणारे धार्मिक कथन ऐका. निगर्वीपणे विनम्र होऊन योग्य वेळी गुरूपाशी जावे. सदर्थ, धर्म, संयम व ब्रह्मचर्य यांचे स्मरण ठेवून ती आचरावीत- सुत्त निपात: ३२४ व २२६-

वृद्धापचायी अनुसुय्यको सिया। कालञ्ञऽस्स गरुनं दस्सनाय।।


संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.

धम्मिकथं एजयितं खणञ्जू। सुणेय्य सक्कच्च सुभासितानि।।

कालेन गच्छे गरुनं सकासं। थंभं निरंकत्वा निवातवुत्ति।।

अध्य धमं संयम ब्रह्मचयरिया। अनुस्सरे चेव समाचारे चा।।

ज्या गुरूद्वारे ईश्वरप्राप्ती होते, त्यास सद्गुरू असे म्हणतात. तो संपूर्ण मानवांच्या व जगताच्या कल्याणासाठी अर्थात केवळ परोपकार करण्यासाठी अवतरित होत असतो. त्याने दिलेले ब्रह्मज्ञान हे दिव्यज्ञान असते. शिष्य जसा त्याचा वापर करेल तसा त्याचा परिणाम त्याच्या जीवनात दिसून येईल. तप्त लोहाच्या गोळ्याप्रमाणे ते असते. त्यापासून सुईसारखे हत्यार घडविल्यास ते जोडण्याच्या कामी पडते. तर सुरी घडविल्यास ती तोडते. सद्गुरूला मात्र मनाशी मने व माणसाशी माणसे जोडणारा शिष्य अपेक्षित असते. तेव्हाच ब्रह्मज्ञान सत्कारणी लागले, असे म्हणता येते, अन्यथा नाही. तप्त लोहगोळ्यावर काहीच प्रक्रिया केली नाही तर तो थंड होऊन



निरुपयोगी ठरतो. अगदी तसेच या ब्रह्मज्ञानाचे सुद्धा आहे. म्हणून त्याचा उपयोग जनकल्याण साधन्याच्या कामी केला पाहिजे. स्वार्थापेक्षा परमार्थ अधिक पटीने साधला पाहिजे. शिष्याने आपल्या दैनंदिन जीवनात चुकल्या-माखल्याची क्षमायाचना या गुरूपूजेच्या पावन समयी केली पाहिजे. कारण जगद्गुरू संत तुकाराम महाराज सांगतात-

सद्गुरूवांचोनि सापडेना सोय!
धरावे ते पाय आधी आधी!!

ब्रह्मज्ञान मिळाल्यावरच खऱ्या भक्तीला सुरवात होत असते, अन्यथा पालथ्या घड्यावरचे पाणी ठरते. आपल्या भक्तीला नटवण्या-थटवण्याचे काम आपले सत्कर्म करीत असतात. तर आपल्या भक्तीला बदनाम व वाया दवडण्याचे काम आपले दुष्कर्म करतात. म्हणून दुष्कर्मांचा अव्हेर केला पाहिजे. समोरचे मनोहारी दृश्य बघण्यासाठी लोक गर्दी करतात. अशावेळी आई बाळाला कडेवर घेत असते. तर वडील मुलाला खांद्यावर घेत असतात.

दिन विशेष

याबाबत त्यांना प्रश्न केले, की असे का? तर ते कृपाळू मायबाप मोठ्या महत्वाकांक्षेने सांगत असतात, की आपण जे पाहू शकलो नाही. ते आपल्या लाडक्या मुलांनी पाहावे. आहे की नाही हे नवल? किती हे औदार्य, किती ही दया! मायबापांची जशी अपेक्षा व महत्वाकांक्षा तशीच सद्गुरूची पण असते. मायबापांनी कड्या-खांद्यावर घेतलेल्या मुलांनी मात्र अपेक्षेप्रमाणे जे डोळ्यांत साठवायचे आहे, नेमके तेच दृश्य साठवले पाहिजे. तरच ते कष्ट सार्थकी ठरले म्हणावे. जर मुलांनी लोकांचे काळे-गोरेपणा, साधे-झकपक पोषाख, काळे-पांढरे केस आदी गोष्टीच न्याहाळत राहिले. तर मात्र मायबापांचे परिश्रम, इच्छा व महत्वाकांक्षा पार धुळीस मिसळून गेले की हो! यशस्वी जीवनात अशा मौलिक संधी आणि उपलब्धता या केवळ गुरूद्वारे मिळालेल्या ज्ञानामुळे शक्य झाले. ही कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी गुरूला नमन करण्याचा, गुरू पूजन करण्याचा हा गुरुपौर्णिमा सण आहे. मायबाप, पालक, मार्गदर्शक हे सगळेच गुरुस्थानी मानावे. ज्याला गुरू नाही, असा मनुष्य जगात शोधूनही सापडणार नाही. गुरू सहजच कितीतरी मिळतात, मात्र सद्गुरू सदसद्विवेक बुद्धी जागृत ठेऊन मिळवावा लागतो. संतशिरोमणी अवतारसिंहजी महाराज समजावतात- सम्पूर्ण अवतारबाणी: पद क्र. १४१- ओवी ९ व १० वी-

रीझ जाय यदि सद्गुरू अपना रीझ गया समझो भगवान!

कहे 'अवतार' गुरु कृपा से कण मिट्टी का गगन समान। खरे गुरुपूजन, खरी गुरुपूजा म्हणजे गुरुंनी आपल्याला जे ज्ञान दिले आहे, जो बोध केला आहे, जी शिकवण दिली आहे त्याचे प्रत्यक्ष आचरण करणे. सद्गुरुंनी दाखवून दिलेल्या साधना मार्गाचा अभ्यास करणे, त्यांचा शब्द शिरसावंद्य मानून त्यावर चालणे म्हणजे खरे गुरुपूजन! खरे तर गुरूंच्या उपकारांनी आपले मन कृतज्ञतेने भरून येते, गुरूगीतेत म्हटलेच आहे-

ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः पूजामूलं गुरोः पदम्। मंत्रमूलं गुरोर्वाक्यं मोक्षमूलं गुरोःकृपा।।

!! गुरुपौर्णिमा निमित्ताने सर्व बंधुभगिनींना हार्दिक शुभेच्छा जी !!

---

# स्वाधार महिला निवास गृहाला जिल्हाधिकाऱ्यांची भेट

## महिला प्रशिक्षणार्थीसोबत संवाद



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर - मूल रोडवर असलेल्या स्वाधार महिला निवासगृहाला जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी भेट देऊन येथे प्रशिक्षण घेत असलेल्या महिलांसोबत संवाद साधला. यावेळी चंद्रपूरचे उपविभागीय अधिकारी संजय पवार, तहसीलदार विजय पवार, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दीपक बानाईत, बाल संरक्षण अधिकारी अजय साखरकर, निवासगृहाचे व्यवस्थापक घनश्याम कामटकर, अधिक्षिका शारदा चट्टे, समुपदेशिका शारदा वाघमारे, शिवणकाम प्रशिक्षिका बुरडकर, जिल्हा कौशल्य विकास समन्वयक मुकेश गुंजनकर आदी उपस्थित होते.

कृष्ण नगर येथील स्वाधार महिला निवासगृहात ३० महिलांचे प्रशिक्षण सुरू असून सदर प्रशिक्षण हे साडेतीन महिन्यांचे आहे. या प्रशिक्षण केंद्राला जिल्हाधिकारी यांनी भेट देऊन येथील महिलांसोबत संवाद साधला. तुमचे नाव काय, कुठुन आलात, राहता कुठे, शिवणकाम प्रशिक्षण आवडले का, यानंतर काय करणार आहात, अशी विचारणा जिल्हाधिका-यांनी केली. यावर गोंदिया येथून आलेल्या वेदकी ब्राम्हणकर म्हणाल्या, आम्हाला प्रशिक्षणाची चांगली संधी मिळाली आहे, या प्रशिक्षणातून रोजगार मिळण्यास मदत होईल. यावेळी अधिकाऱ्यांना सुचना करतांना जिल्हाधिकारी म्हणाले, या स्वाधार महिला निवास गृहात महिलांचे पुनर्वसन आणि प्रवेश नियमित सुरू ठेवा. तसेच शासनाच्या मुख्यमंत्री : माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळण्यासाठी येथील सर्व महिलांचे अर्ज त्वरीत भरून घ्या. कागदपत्रांची कमतरता असेल तर ते तपासा व संबंधित कागदपत्रे महिलांना उपलब्ध करून द्या. येथील महिलांना लाडकी बहीण योजनेचा फायदा मिळण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी लक्ष द्यावे, अशाही सुचना त्यांनी केल्या.

---

# नुकसानग्रस्त घरांचे व शेतीचे पंचनामे करण्याचे निर्देश

## जिल्ह्यात पावसाची संततधार, नागरिकांनी दक्षता घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

नागपूर प्रादेशिक हवामान केंद्राने दिनांक १९ व २० रोजी मिळालेल्या रेड अलर्ट नंतर जिल्हा प्रशासनाने संपूर्ण जिल्ह्यांच्या नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले होते. दिनांक १९ व २० जुलै रोजी पडलेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यात जवळपास ५०० ते ६०० घरांचे अंशत: नुकसान झाले आहे, तसेच जिल्ह्यातील मुख्य मार्ग नागभीड - नागपूर हायवे पुराच्या पाण्यामुळे बंद पडला होता. त्याचबरोबर जिल्ह्यातील इतर मार्ग जे पावसाच्या पाण्यामुळे बंद पडले होते, ते पाण्याचा प्रवाह कमी झाल्यानंतर मार्ग मोकळे झाले आहेत. घरांचे नुकसान तसेच शेताचे नुकसान यांना मदत कार्यासाठी शासनाच्या आदेशानुसार जिल्हा प्रशासनाने संबंधित तहसीलदार तसेच कृषी अधिकारी यांना पंचनामा करण्यासाठी निर्देश देण्यात आले आहेत. १९ व २० रोजी झालेल्या पावसामुळे पोंभुर्णा तालुक्यातील जामखुर्द येथील एका घराची भिंत पडल्यामुळे पाच लोक जखमी झाले, यांच्यावर ग्रामीण रुग्णालय येथे उपचार चालू आहे. नागभीड तालुक्यातील विलंब या गावचा रहिवासी असलेला ८ ते १० वर्षाचा रोनाल्ड पावणे हा मुलगा विलंब रोडवरील नाल्यावरून वाहून गेला आहे. त्याच्या शोध मोहिमेकरिता जिल्हा आपत्ती व्यवस्थापन शोध बचाव पथकाला पाठवण्यात आले आहे. तसेच नागभीड तालुक्यातील मौजे बोथली येथील नाल्यात ३० वर्षाचा इसम स्वप्निल दोनोडे हा बुडून मृत पावला आहे. त्याचा मृतदेह स्थानिक शोध बचाव पथकाच्या मदतीने मिळाला असून पुढील कार्यवाहीकरीता नागभीड पोलीस विभागाकडे सोपवण्यात आले आहे.

जिल्हा प्रशासनाचे आवाहन: गत २४ तासापासून जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडत असून पुढील दोन - तीन दिवस सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी पूर परिस्थितीत योग्य काळजी घ्यावी. तसेच मदतीकरीता जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्षाच्या ०७१७२-२५००७७ आणि ०७१७२-२७२४८० या क्रमांकावर संपर्क करावा. तसेच पूर परिस्थितीत नागरिकांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले आहे.

**गत २४ तासात जिल्ह्यात झालेला पाऊस:**

**गत २४ तासात चंद्रपूर तालुक्यात ३२.७ मिमी. पाऊस, मूल ६४.७ मिमी., गोंडपिपरी २३.५ मिमी., वरोरा ४७.४ मिमी., भद्रावती २८.६ मिमी., चिमूर १०७.१ मिमी., ब्रम्हपूरी १९०.१ मिमी., नागभीड १२० मिमी., सिंदेवाही १०२.४ मिमी., राजुरा २७.६ मिमी., कोरपना १८.४ मिमी., सावली ६८.६ मिमी., बल्लारपूर ३०.५ मिमी., पोंभुर्णा २०.३ मिमी., आणि जिवती तालुक्यात १९.४ मिमी. पावसाची नोंद करण्यात आली.**

---

# क्राउडस्ट्राइक अपडेटमुळे मायक्रोसॉफ्टची १५ तास सेवा ठप्प

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

अमेरिकन अँटी-व्हायरस कंपनीच्या अपडेटमुळे मायक्रोसॉफ्टवर परिणाम झाला. त्यामुळे शुक्रवारी (१९ जुलै) सकाळी ५ ते रात्री ८ वाजेपर्यंत १५ तास विमानसेवा, टीव्ही टेलिकास्ट, बँकिंग आणि जगभरातील अनेक कॉर्पोरेट कंपन्यांच्या कामकाजावर परिणाम झाला. जवळपास १४०० उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. ऑनलाइन सेवा ठप्प झाल्यामुळे अनेक विमानतळांवर फ्लाइट बोर्डिंग पास हाताने देण्यात आले.तुम्ही कदाचित अँटी-व्हायरस फर्म क्राउडस्ट्राइकबद्दल कधीच ऐकले नसेल, पण कंपनीने त्याच्या व्हायरस स्कॅनर फाल्कनने जे केले त्याचा फटका मायक्रोसॉफ्ट विंडोज ऑपरेटिंग सिस्टमवर चालणाऱ्या लाखो संगणकांना बसला आहे. मायक्रोसॉफ्टने पहाटे पाचच्या सुमारास ही माहिती दिली. तथापि, ॲपल आणि लिनक्स वापरकर्त्यांना प्रभावित झाले नाही.भारतातही त्याचा सर्वाधिक परिणाम विमानतळावर दिसून आला. विमान कंपन्यांच्या चेक इनसारख्या ऑनलाइन सेवांवर याचा परिणाम झाला. मुंबई, दिल्ली, चेन्नई, बंगळुरूसह देशभरातील विमानतळांवर मोठी गर्दी दिसून आली. माहितीअभावी लोक विमानतळावर तासनतास थांबले.

---

# जीवन मंगलमय होण्यासाठी नैतिकता पाळावी (वर्षावासाचा उद्देश)

चरथ भिक्खवे चारिकं, बहुजन हिताय, बहुजन सुखाय, लोकानुकम्पाय, अत्थाय हिताय देवमनुस्सानं ।
देसेथ भिक्खवे धम्मं, अदिकल्याणं मज्झकल्याणं, परियोसानकल्याण, सात्थ सब्यञ्जनं ब्रम्हचरियं पकासेथ।।

तथागतांनी धम्म प्रचार व प्रसारासाठी भिक्खूंना आदेश दिला. भिक्खूहो, बहुजनांच्या हितासाठी, सुखासाठी, लोकांवर अनुकंपा करण्यासाठी, मानवांना कल्याणकारी, धम्मपदेश करण्यात तुम्ही प्रवृत्त व्हा, प्रारंभी कल्याणपद, मध्यंतरी कल्याणपद आणि शेवटीही कल्याणपद अशा या धम्म मार्गाचा लोकांना उपदेश करा. वर्षावास म्हणजे पावसाळ्यातील निवास आषाढी पौर्णिमेपासून आश्विन पौर्णिमेपर्यंत, या तीन महिन्यात फक्त बुद्ध विहारात जीवन व्यतीत करणे. या काळात भिक्खूंनी धम्म-प्रचार-प्रसारासाठी स्वत:ला तयार करणे, बौध्द उपासक/उपासिकांना धम्माचं महत्व सांगणे, ध्यान-साधना करणे, धम्मदान स्विकारणे आदि नित्यक्रम करावे असा आदेश तथागतांनी भिक्षूसंघास दिला. त्याप्रमाणे ते आचरण करीत असत. यालाच वर्षावास म्हणण्याची प्रथा सुरु झाली, ती आजतागायत अविरत सुरु आहे यात खंड नाही. इथेच वर्षावासाचं महत्व सर्वश्रुत आहे. तथागतांनी बुद्धत्व प्राप्तीनंतर पंचवर्गीय संन्याशांना आपला अष्टांगिक मार्ग, प्रतीत्य समुत्पाद, चार आर्यसत्य हे समजावून दिल्यानंतर त्यांना ते कळले. इसिपतन वन (आधुनिक सारनाथ), वाराणसी येथे अनुत्तर असे पहिले धम्मचक्र प्रवर्तन केले. आश्विन पौर्णिमेला एकसष्ठ अर्हत भिक्षुंच्या समवेत धम्मचक्राची घोषणा केली. चारही दिशांना जाऊन बहुजन हिताय - बहुजन सुखाय धम्माची अशी सिंहगर्जना केली.

तथागत बुध्दांची पहिली धम्मसभा आषाढी पौर्णिमेला झाली. पुढे भिख्खूसंघाच्या निर्मीतीनंतर दरवर्षी याच कालावधीत उपासक वर्षावास करतात. याची सुरुवात आषाढी पौर्णिमेला होते आणि याच काळात पंढरीची वारी ही सुरु होते, हे निव्वळ योगायोग नाही. भगवान बुद्धाच्या काळात बुद्धांनी सर्व भिक्षूंना धम्माचा प्रसार करण्याचे आदेश दिले आणि सर्व बौद्ध भिख्खू या कामात गुंतले होते, परंतु असे केल्याने त्यांना बऱ्याच संकटांना आणि विशेषत: पावसाळ्यात नद्यांमध्ये अनेक संकटांना सामोरे जावे लागे. पुरामुळे बौद्ध भिख्खू वाहून जात आणि त्यांच्या चालण्याने शेतातील पिकांचे नुकसान होत त्यांनी हे तथागतांना सांगितले, बुद्धांनी आदेश दिला की आषाढ पौर्णिमेपासून ते अश्विनी पौर्णिमेपर्यंत सर्व भिक्षूंनी एकाच ठिकाणी रहावे, भिक्षेसाठी गावात जाऊ नये. एकाच ठिकाणी राहून धम्माचे पठण अध्ययन करावे. जर गरज पडली तर भिक्षू आपल्या गुरूंकडून जास्तीत जास्त एका आठवड्याचा वेळ घेऊन विहारातून बाहेर जाऊ शकतात, भगवान बुद्ध काळापासून वर्षावास अस्तित्वात आहे. तथागतांनी ४५ वर्षावास श्रावस्ती, जेतवन, वैशाली, राजगृह इत्यादी ठिकाणी केले. अशा प्राचीन गुरू-शिष्य परंपरेचे पालन आजही भारतात आणि बौद्धराष्ट्र थायलंड, म्यानमार, श्रीलंका, कंबोडिया आणि बांगलादेश पालन करतात.



प्रविण बागडे
नागपूर
९९२३६२०९१९


आषाढ पौर्णिमेला वर्षावास सुरू होतो आणि अश्विन पौर्णिमेला संपन्न होतो, बौध्द धम्मात वर्षावासाला अनन्य साधारण महत्व आहे, सर्व बौध्द उपासक उपासिकांनी या तीन महिन्याच्या कालावधीत स्व:ताच्या घरी रोज बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या बुध्द आणि त्यांचा धम्म या पुस्तकाचे किंवा अन्य बुद्ध धम्माशी संबंधित पुस्तकाचे रोज सामुहिक वाचन करून त्यावर मनन चिंतन करावे व त्याचे आपल्या जिवनात अनुकरण केले पाहिजे, नियमितपणे शेजारच्या बुध्दविहारात जावून धम्म श्रवण करावा व धम्ममार्गावर आरूढ व्हावे, धम्मदान द्यावे, उपोसथ व्रत घेऊन अष्टशिलाचे पालन करून सदगुणाचा पाया मजबूत करावा, आपल्याप्रमाणे प्रत्येक कुटुंबास यानुसार आचरण करण्यास प्रोत्साहित केल्यास बौध्द उपासकांचा मोठा संघ तयार होईल व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाहिलेल्या प्रबुध्द भारताचे दिव्य स्वप्न साकार होण्यास हातभार लागेल.

बुद्धांनी शिकवले की उपोसथ दिवस म्हणजे अशुद्ध मनाची शुद्धता करण्याचा दिवस होय, उपोसथ किंवा उपोस्थ या शब्दाचा अर्थ उप+स्था म्हणजे एकत्र बसणे होय, भिक्षुसंघाची एकसंघपणा टिकवून राहण्यासाठी उपोसथ विधी खूप महत्त्वाचा मानला गेला. उपोसथ विधी बुद्ध काळापासून अस्तित्वात आहे आणि बौद्ध देशांमध्ये उपोसथ विधी श्रद्धापूर्वक पाळला जातो. अमावस्या आणि पौर्णिमेच्या दिवशी भिख्खू पटिमोक्खा (आचारसंहितेचे नियम) यांचे पाक्षिक कबुलीजबाब आणि पाठ होते. या दिवशी बौद्ध उपासक आणि भन्ते धम्म अध्ययन आणि ध्यानाची तीव्रता आणखीन वाढवतात. विनयासंबधी जर आचारात काही दोष आला असेल तर उपोसथ दिनी भन्ते सर्वांसमोर कबुलीजबाब देत असत व संघ नियमानुसार त्यांना पुढील कारवाईस समोर जावे लागत. हा विधी खूप पवित्र मानला जाई, आजही त्याचे पालन केले जाते.

धम्माप्रती वचनबद्ध उपासक गृहस्थ पंचशील, दहा परिमिता, अष्टांगिक मार्गाचे पालन करतात धम्म आचरणात उत्साह जागृत होण्याकरिता समाधी मार्गाचे, ध्यानाचे अवलंबन करतात. जेव्हा शक्य असेल तेव्हा उपासक या दिवसाचा उपयोग स्थानिक विहारात जाण्याची संधी म्हणून करतात. या दिनी संघाला विशेष दान अर्पण केले जाते, धम्म प्रवचन ऐकले जाते आणि रात्री उशिरापर्यंत धम्म बांधवा सोबत ध्यान-धारणा केली जाते. जे उपासक विहारात जाऊ शकत नाहीत अशांना ही उपोसथ दिन संधी देतो कि, आपले ध्यान करण्याचे प्रयत्न वाढवावे कारण या पवित्र दिनी जगातील हजारो उपासक ध्यान धारणेचा अभ्यासात वुद्धी होण्याच्या दिशेने पाऊल टाकतात. तथागत बुद्धांच्या आदेशानुसार भिक्खुसंघ धम्म प्रचारासाठी सर्व ऋतूत चारही दिशांना पायी फिरत असत, या तिन्ही ऋतुत त्यांना अनेक संकटांचा सामना करावा लागत असे, नैसर्गिक संकटांचा सामना करून प्रतिकूल परिस्थितीतही ते धम्माचा प्रचार-प्रसार करीत असत. हे सर्व लक्षात घेऊन तथागत बुद्धांनी भिख्खू संघाला आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा या कालावधीत, एकाच ठिकाणी विहारात राहून धम्माचा अधिक अभ्यास करीत आसपासच्या परिसरातील उपासकांना धम्मज्ञान देण्याबाबत सूचना दिल्या, आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा हा काळ वर्षावास म्हणुन तेव्हापासुन संपन्न होऊ लागला (वर्षावास म्हणजे पावसाळयातील निवास) वर्षावास काळात श्रध्दावान उपासक विहारात जावून धम्म-श्रवण करतात, विहारात भिख्खूंना श्रध्दाभावनेने भोजनदान करतात व आजही सातत्याने सुरु असतात. फार महत्व आहे या पोर्णिमेचे.. आपण आपली संस्कृती जपली पाहिजे.


# गडचिरोली जिल्ह्यात सर्वत्र मुसळधार पाऊस पडल्याने अनेक नद्या आणि नाल्यांना पूर

## गडचिरोली जिल्ह्यात मुसळधार पाऊस,१४ मार्ग बंद







**गडचिरोली I प्रतिनिधी**

रात्रीपासून जिल्ह्यात सर्वत्र मुसळधार पाऊस पडल्याने अनेक नद्या आणि नाल्यांना पूर आला आहे. यामुळे १४ मार्गावरील वाहतूक ठप्प झाली आहे. तर, भामरागडनजीकच्या पर्लकोटा नदीला पूर आला आहे.

मागील चोवीस तासांत देसाईगंज तालुक्यात सर्वाधिक १३७ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. त्याखालोखाल कुरखेडा तालुक्यात ११६.६ मिलिमीटर पाऊस पडला. भामरागडनजीकच्या पर्लकोटा नदीच्या पुलावरुन पाणी वाहू लागल्याने तेथे बॅरिकेट लावून पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. पुरामुळे आलापल्ली-भामरागड, भामरागड-एटापल्ली अहेरी-मोयाबीनपेठा, कुरखेडा- चारभट्टी, आलापल्ली-सिरोंचा, जारावंडी ते पाखांजूर, पोर्ला-वडधा, वैरागड-शंकरपूर, कुरखेडा-वैरागड, कारवाफा-पोटेगाव, मालेवाडा-खोब्रामेंढा, गोठणगाव- सोनसरी, देसाईगंज-आंधळी, लखमापूर बोरी-गणपूर या १४ मार्गावरील वाहतूक ठप्प झाली आहे.

दरम्यान, भंडारा जिल्ह्यातील गोसेखुर्द प्रकल्पाचे ३३ पैकी २७ दरवाजे उघडण्यात आले असून, तेथून ३ हजार ३३ क्युमेक्स, तर तेलंगणा राज्यातील मेडिगड्डा बॅरेजमधून १० हजार ५७६ क्युमेक्स पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. गोसेखुर्द धरणातून ५ हजार क्यूमेक्सपर्यंत पाण्याचा विसर्ग वाढविणार असल्याने नदीकाठावरील गावकऱ्यांनी सतर्क राहावे, असा इशारा जिल्हा प्रशासनाने दिला आहे. हवामान विभागाने गडचिरोली जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट दिला असून, काही ठिकाणी फ्लॅश फ्लड सिक्चे संकेत दिले आहेत.

---

# मोकाट जनावरे पकडण्याची मोहिम मूल येथे सुरु

**मूल I प्रतिनिधी**

शहरातील मोकाट जनावरे पकडण्याची मोहीम अखेर नगर परिषद मूल सुरू केली आहे. मंगळवारी (ता. १८) पालिकेच्या पशुसंगोपन व अतिक्रमण निर्मूलन विभागाने मिळून ८७ मोकाट जनावरे पकडली. सर्वाधिक म्हणजे नागपूर रोड, चंद्रपूर रोड, ताडाळा रोड तसेच एपीएमसी चौकात पकडण्यात आली आहेत.

या मोहिमेमुळे आता शहरातील मोकाट जनावरांची संख्या व समस्याही कमी होईल अशी अपेक्षा आहे. गुरूवारच्या या मोहिमेत पालिकेच्या आरोग्य विभागानेही सहकार्य केले.

नगर परिषद मूल तर्फे जनतेच्या मागणीनंतर मूल शहरातील मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्याची मोहीम सूरु करण्यात आली



असून दिनांक १८ जुलैला रात्रो राबविण्यात आलेल्या मोहीमेत नागपूर रोड, चंद्रपूर रोड, ताडाळा रोड तसेच एपीएमसी रोडवरून एकूण ८७ मोकाट जनावरे पकडून कांजीत टाकण्यात आले. या मोहीमेचे नेतृत्व अभय चेपूरवार आरोग्य निरिक्षक यांनी केले.

मोकाट जनावरे रोडवर बसत असल्याने वाहतूकीस अडथळा निर्माण करणा-या जनावरांचे मालकांना वारंवार लाउडस्पिकरद्वारे मूनादी देवून सूध्दा यामध्ये कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद न मिळाल्याने सदर मोहीम हाती घेण्यात आली.

> **“ नगर परिषद मूल क्षेत्रातील जनावरे पाळणाऱ्या मालकांनी कांजीतील मालकीची जनावरे ३ दिवसाचे आत दंड रक्कम भरणा करुन सोडवावी अन्यथा नगर परिषदेच्या वतीने गोशाळेमध्ये पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर कोणत्याही प्रकारची उजर तक्रार विचारात घेता येणार नाही. तसेच शहरातील नागरीकांनी आपले मालकीचे जनावरे रोडवर न सोडण्याचे आवाहन यशवंत पवार मूख्याधिकारी नगर परिषद मूल यांनी केले आहे.**

---

# निवड समिती सदस्य तथा उपसरपंच यांची त्याच ग्रामपंचायत मध्ये चपराशी म्हणून नियुक्ती

## निवड समितीचा असाही प्रताप: कारवाईची मागणी

**भद्रावती I प्रतिनिधी**

निवड समिती मधीलच ग्राम पंचायत चपराळा येथील उपसरपंच यालाच निवड समितीने ग्रामपंचायत चपराशी म्हणून नियुक्ती केल्याने सर्वत्र आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे. यासंदर्भात किशोर भूपेंद्र ताजणे यांनी जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना निवेदनातून कारवाईची मागणी केली आहे.

चपराळा ग्रामपंचायतचे चपराशी पद रिक्त असल्याने सरपंच आणि सचिवांनी दिनांक ११ सप्टेंबर २०२३ ला पद भरतीची जाहिरात काढली. ही जाहीरात चुकीच्या पध्दतीने जनते सामोर प्रसारीत करण्यात आली. यात निवड समिती मधिल सरपंच, उपसरपंच, सचिव व जि.प. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक यांनी आपल्या समिती मधीलच उपसरपंच ज्ञानेश्वर सिडाम यांना ग्राम पंचायत चपराशी म्हणून निवडले. जाहीरातीमध्ये मुलाखतीचा कॉलम नसतांना सुध्दा मुलाखत घेण्यात आली. तक्रारकर्ता किशोर ताजणे हा उच्च विद्याविभूषीत असून एम.ए. पर्यंत शिक्षण घेतले आहे. त्याने सुद्धा या पदासाठी अर्ज केला होता. परंतु मला हेतूपुरस्पर डावलण्यात आल्याचे जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. निवड समितीने चपराशी म्हणून जी नियुक्ती केली आहे. ती अवैध असून त्याला तात्काळ त्या पदावरून काढून टाकण्याची मागणी सुद्धा किशोर ताजणे याने केली आहे. सदर निवेदन मुख्य कार्यपालन अधिकरी चंद्रपूर, तहसिलदार भद्रावती, गटविकास अधिकारी पंचायत समिती भद्रावती खासदार प्रतिभा धानोरकर यांना पाठविण्यात आले आहे.

---


# दोन दिवसाच्या पावसाने शेतातील पिके प्रभावित

## कृषी विभागाकडून सर्वेक्षण करा

**सेलू I प्रतिनिधी**

सेलू तालुक्यात सतत दोन दिवस मुसळधार पाऊस झाल्याने शेतातील पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून या नुकसानीचे शेताच्या बांधावर जाऊन कृषी विभागाकडून सर्वेक्षण करा अशी मागणी शेतकरी करीत आहे.

शुक्रवार व शनिवार असे दोन्ही दिवस मुसळधार पाऊस आला त्यात शेत शिवारात असणारे नाले ओसंडून वाहायला लागले त्यात पुराचे पाणी शेतात घुसल्याने पिके खरडून गेली तर काहींच्या शेतात पाणी साचल्याने पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले या बाबतची तक्रार करण्यासाठी शेतकरी पीक विमा कार्यालयात जात आहे पण या नुकसानीचा सर्वे हा कृषी विभाग कडूनच व्हावा अशी मागणी शेतकरी करीत आहे.



बहुतांश शेतकऱ्यांनी पीक विमा काढलाच नसल्याने अनेक शेतकऱ्यांपुढे तक्रार करावी तर कुणाकडे असा प्रश्न निर्माण झाला आहे त्या मुळे कृषी विभागाकडून याची दखल घेतल्यास शेतकऱ्यांना न्याय मिळू शकेल अशी आशा आहे.

> **लिंबू पिकाला फटका**
>
> सतत आलेल्या मुसळधार पावसामुळे लिंबू, सोयाबीन , व तूर पिकाला मोठ्या प्रमाणात फटका बसला असून घोराड येथील पंकज तडस यांच्या एक एकर शेतातील झाडाचे लिंबू गळून पडल्याने आर्थिक फटका बसला आहे .तर शेकडो एकर सोयाबीन व तूर पिकाला फटका बसला आहे.

---

# ग्राहकांची विश्वासहर्ता वाढवून बँकेचे वटवृक्षात रूपांतर करा :डॉ.विवेक शिंदे

## बँक ऑफ बडोदाचा ११७ वा वर्धापन दिन

**भद्रावती I प्रतिनिधी**

आपल्या बँकेची ग्राहकांप्रति आणखी विश्वासहर्ता वाढवून जास्तीत जास्त ग्राहकांना आपलेसे करा. ही शाखा वटवृक्षा सारखी डेरेदार करण्यासाठी प्रयत्न करा. असे विचार समारंभाचे प्रमुख पाहुणे डॉ. विवेक शिंदे यांनी मांडले. ते बँक ऑफ बडोदाच्या ११७व्या वर्धापन दिनानिमित्त शाखेत आयोजित समारंभात बोलत होते.

सन १९०८ मध्ये राजे सर सयाजीराव गायकवाड (तृतीय) यांनी गुजरात येथील बडोदा शहरात स्थापन केलेल्या बँकेच्या आज १०० देशात शाखा आहेत. ही देशातील अग्रगण्य बँक आहे.२०१२ मध्ये या ठिकाणी बँकेची शाखा उघडण्यात आली. अपेक्षेपेक्षा जास्त प्रमाणात भद्रावतीकरांनी आम्हाला सहकार्य केले आहे. यापुढेही भद्रावती करांकडून यापेक्षा जास्त सहकार्य मिळेल अशी




अपेक्षा बँक व्यवस्थापक अतुल ठावरी यांनी व्यक्त केली. दिलीप ठेंगे, अविनाश सिद्धमशेट्टीवार यांनी सुद्धा आपले विचार मांडले. तत्पूर्वी सयाजीराव गायकवाड यांच्या प्रतिमेला मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून दिपप्रज्वलित केला. दि.१९ जुलैला येथील भवानी मंदिरा लगतच्या नगर परिषदेच्या रुग्णालयाचे परिसरात वृक्षारोपण पार पडले. या दोन्ही कार्यक्रमास यावेळी शाखेच्या सहाय्यक व्यवस्थापक मनीषा शेंडे, वरिष्ठ लिपिक अतुल जाधव, रोखपाल सुशांत गावंडे, मिलिंद चेंदे, साहिल नागपुरे, धनराज लांडगे, रामा मते तसेच असंख्य ग्राहक उपस्थित होते.

---

# संतनगरी वढोली बनली समस्यानगरी




**गोंडपिपरी I प्रतिनिधी**

गोंडपिपरी तालुक्यातील वढोली ही तालुक्यात संत नगरी म्हणून ओळखल्या जाते. गावात मोठया प्रमाणात सामाजिक,धार्मिक,सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असते तालुक्यात या गावची ओडख संतनगरी अशी आहे.मात्र आता तीच संत नगरी समस्या नगरी बनल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

येथील अनेक सार्वजनिक नाल्या साफ नसल्याने गावात अनेक ठिकाणी पाणी साचले आले गावातील मुख्य रस्त्यावरून पाणी ओसंडुन वाहत आहे.मोठ्या प्रमाणात जागोजागी पाणी साचले आहे.गावातील वढोली - बोरगाव मुख्य मार्गाची अनेक वर्षापासून दयनीय अवस्था झाली आहे रस्ता मंजूर नसल्याने रस्त्यावर मोठ्या प्रमानात गिटी निघाली आहे जागोजागी खड्डे पडले आहे.पावसामुळे हा मार्ग चीखलमय झाला असून वाहनचालकांना जीव धोक्यात टाकून प्रवास करावा लागत आहे.नाल्या साफ नसल्याने गावातील रस्तावरून पाणी मोठ्या प्रमाणात ओसंडुन वाहत आहे.गावातील या प्रकारावर नागरिकांकडून संताप व्यक्त केल्या जात आहे.

> **“ वढोली - बोरगाव मार्गाची अवस्था अंत्यंत खराब आहे.पायदळ चालणे देखील कठीण झाले आहे.ग्रामपंचायतने पाठपुरावा करावा आमदारांनी लक्ष घालून नवीन रस्ता मंजुरी साठी प्रयत्न करावे.**
>
> **सुरज माडूरवार**
> **तालुका प्रमुख शिवसेना,गोंडपिपरी**

---

# फालतू बडबड करायला मी मोकळा नाही;तिन्ही पक्षांसोबत मिळून विधानसभा लढवण्याचा दावा

**पुणे**–महायुतीचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण असा प्रश्न विचारताच उपमुख्यमंत्री अजित पवार चांगलेच भडकले. असली फालतू बडबड करायला मी मोकळा नाही मला गरिबी, विकास याबाबत विचारत जा, असे पुण्यात अजित पवारांनी माध्यमांशी संवाद साधताना म्हटले आहे. भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी या तीन पक्षांच्या नेत्यांच्या नेतृत्त्वाखाली आगामी विधानसभा निवडणूक लढवली जाणार आहे. मुख्यमंत्रिपदासंदर्भात काहीही काळजी करू नका. या राज्याला मुख्यमंत्री दिला जाईल, असे अजित पवारांनी म्हटले आहे.अजित पवार पुढे बोलताना म्हणाले की, मी कामाचा माणूस आहे. तुम्ही सगळे अंथरूणात असताना माझी सकाळी सात वाजता बैठक चालू झाली होती.याच कारणामुळे मी तुमच्याशी बोलत नाहीत. असली फालतू बडबड करायला मी मोकळा नाही. मी फक्त सांगतोय. त्यामुळे मला फक्त विकासाबाबत, गरिबीबाबत प्रश्न विचारा, अशी नाराजी अजित पवार यांनी व्यक्त केली.राष्ट्रवादीच्या कार्यक्रमाच्या ठिकाणी आणि तुम्ही जॅकेट सुद्धा गुलाबी रंगाचे वापरत आहात? याबद्दल प्रसारमाध्यमाच्या प्रतिनिधीने प्रश्न



विचारल्यावर अजितदादा म्हणाले, तुला काही त्रास होतोय का? मला व्यक्तिस्वातंत्र्य आहे. मी कोणते कपडे घालायचे, तो माझा अधिकार नाही का? मी माझ्या पैशाने कपडे घालतो. तुमच्या कुणाच्या पैशाने घालत नाही. जो सर्वसामान्य माणूस घालतो, त्याच पद्धतीने मीही पेहराव करतो. माझ्या सदसदविवेक बुद्धीला स्मरून मला जे योग्य वाटते ते करतो.

महायुतीमधून बाहेर पडत विधानसभेला तिसरी आघाडी करणार का? या प्रश्नावर अजित पवार म्हणाले की, अशा बातम्या मी सुद्धा ऐकत असतो. माझी सुद्धा करमणूक होत असते. एका कानाने ऐकतो आणि दुसऱ्या कानाने सोडून देतो.

---

# राज्यात शेतीच्या योजनेत ११८ कोटींचा घोटाळा,खासदार सुप्रिया सुळे यांनी पैठण येथे सरकारवर साधला निशाना

**पैठण**–राज्यात शेतीच्या योजना मध्ये ११८ कोटींचा घोटाळा झाल्याचा पुरावे संघाच्या जेष्ठांनी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे दिले त्याचे काय झाले याचे उत्तर फडणवीस यांनी द्यावे असे प्रतिपादन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आज पैठण मध्ये व्यक्त केले. त्या पैठण येथे गुणवंतांचा सत्कार व मेळाव्यानिमित्त आल्या होत्या. माजी आमदार संजय वाघचौरे यांनी आयोजित केलेल्या गावनिहाय शेतकरी, शेतमजूर जनसंपर्क अभियानाला खासदार सुळे, फौजिया खान, राजेश टोपे, महेबुब शेख, पांडुरंग तायडे, उमेश पंडुरे, विशाल वाघचौरे, ज्ञानेश्वर कापसे यांच्या उपस्थित प्रारंभ झाला. पुढे बोलताना खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या की, आम्ही लोकसभेच्या निकालानंतर तात्काळ विधानसभेची तयारी सुरू केली आहे. आमच्या पक्षाचे चिन्ह, नाव चोरून घेऊन गेले मात्र याच संघर्षातून नव्याने आम्ही उभे राहत आहोत. नुकतेच संघाच्या वरिष्ठानी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे दिले. मात्र देवेंद्र फडणवीस यांनी याचे उत्तर अद्याप दिले नाही. हिम्मत असेल तर त्यांनी ते सांगावे असे फडणवीस यांना त्यांनी आवाहन केले. आगामी काळात सरकार आपल असणार आहे त्यानंतर सर्वात जास्त पर्यटक महाराष्ट्रातील अजिंठा, वेरुळला येतील, मी दुबईला कधीच जाणार नाही येथे काही नाही त्याच्या पेक्षामहाराष्ट्र अधिक बघण्यासारखे आहे असे सुप्रिया सुळे म्हणाल्या. सध्या देखील देशात दडपशाही सुरू आहे, दडपशाही चालू देणार नाही, ते संविधान बदण्यासाठी ते बसले आहेत. त्यांना संविधान बदलायचे आहे भाजपचे दोन खासदार संसद बोलले आम्ही संविधान वाचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. भाजपचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची स्तुती करत ते चांगले काम करतात असे सांगितले.

# महसूल कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचा सकारात्मक विचार व्हावा;ना. सुधीर मुनगंटीवार यांचे महसूल मंत्र्यांना पत्र

## सीईटीच्या नोंदणीमध्ये विद्यार्थ्यांना येत असलेल्या अडचणींकडे वेधले लक्ष

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्यभरातील महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी संप पुकारला आहे. त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने सकारात्मक विचार व्हावा, अशी विनंती राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना केले आहे. यासंदर्भात पत्र लिहून संपामुळे सीईटीची नोंदणी करण्यात विद्यार्थ्यांना येत असलेल्या अडचणींकडेही त्यांनी मंत्र्यांचे लक्ष वेधले आहे.

महाराष्ट्र राज्यातील महसूल कर्मचारी संघटनेने १० जुलैपासून संप पुकारला आहे. दांगट समितीच्या अहवालातील शिफारशीनूसार कर्मचारी कपात न करणे, अव्वल कारकून/मंडळ अधिकारी संवर्गातील कर्मचाऱ्यांना नायब तहसिलदार या पदावर पदोन्नती देणे, नविन आकृतीबंधानुसार पुरवठा विभागातील लिपीक-टंकलेखक व अव्वल कारकून/पुरवठा निरीक्षकांची पदे सरळ सेवेने भरणे, महसूल विभाग, रोहयो, निर्वाचन व तत्सम विभागाचे वेतन देयके उणे प्राधिकारपत्रावर काढणे, महसुल सहाय्यक व तलाठी या पदांचा ग्रेड पे वाढविणे आदी मागण्यांसाठी कर्मचाऱ्यांनी संप पुकारला आहे. परंतु, विद्यार्थ्यांना एका मोठ्या अडचणीचा सामना यामुळे करावा लागत आहे, याकडे आपण लक्ष द्यावे. तसेच महसूल कर्मचारी संघटनेसोबत बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, असे आवाहन ना. मुनगंटीवार यांनी पत्राद्वारे केले.

महाराष्ट्र शासनातर्फे घेण्यात येणाऱ्या सीईटी परीक्षेची नोंदणी २४ जुलै २०२४ पर्यंत करायची आहे. परंतु, इतर योजनांसाठी तहसील कार्यालयांमध्ये झालेल्या गर्दीत अनेक विद्यार्थ्यांना त्यांचे महसूली दाखले काढणे शक्य झाले नाही. आता तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा संप असल्यामुळे विद्यार्थ्यांना दाखले मिळणे बंद झालेले आहेत. अशा परिस्थितीत २४ तारखेपर्यंत सीइटी चे रजिस्ट्रेशन करणे, डॉक्युमेंट्स व्हेरिफिकेशन करणे अशक्य आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याची दाट शक्यता आहे, असे ना. मुनगंटीवार यांनी पत्रात नमूद केले आहे. जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, नॉन क्रीमी लेयर सर्टीफिकेट व महसूल विभागाशी संबंधीत इतर अनेक सुविधांचा खोळंबा होत असल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले आहे.




### जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

चंद्रपूर जिल्ह्यातील विद्यार्थी तसेच सर्वसामान्य जनतेसाठी नागरी सेवांची पर्यायी व्यवस्था तातडीने उपलब्ध करून द्या, असे निर्देश ना. मुनगंटीवार यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्राद्वारे दिले आहेत. पर्यायी ऑफलाईन सुविधा तत्काळ उपलब्ध करून द्यावी. तसेच २४ जुलैपूर्वी सर्व अर्जांवर योग्य कार्यवाही करुन एमएचसीईटी करीता आवश्यक दाखले विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावेत, असेही निर्देश त्यांनी दिले आहेत.

# नागभीड तालुक्यातील दोघेजण पुरात वाहून गेले; एकाचा मृतदेह सापडला

**नागभीड । प्रतिनिधी**

तालुक्यात दोन व्यक्ती पुरात वाहून गेले. त्यातील एकाचा मृतदेह हाती लागला तर दुसऱ्याची शोधमोहीम सुरू आहे. या दोन घटना वेगवेगळ्या गावातील असल्या तरी एकाच नाल्यावरील आहेत. पहिली घटना विलम येथे घडली. विलम येथील ऋणाल प्रमोद बावणे (११) हा मुलगा सकाळी साडे अकरा वाजताच्या सुमारास गावातील इतर मुलांसोबत गावाजवळच्या नाल्यावर पूर बघण्यासाठी गेला होता. तेव्हा या नाल्यावर वर्दळ सुरू असल्याने हा मुलगाही नाला पार करीत असताना पाण्यात त्याचा पाय घसरला आणि पाण्याच्या प्रवाहात तो वाहून गेला. आजुबाजूला असलेल्या लोकांनी त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला, पण तो असफल झाला. दुसऱ्या घटनेत



बोथली येथील स्वप्नील हेमराज दोनोडे (३०) हा तरुणही गावाजवळून वाहणाऱ्या नाल्यावर पूर बघण्यासाठीच गेला होता. त्याचाही पाय घसरला आणि वाहून गेला. मात्र काही अंतरावर चिखल असल्याने तो चिखलात फसला. उपस्थित नागरिकांनी हालचाल करून त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला. पण तोवर त्याचा मृत्यू झाला होता.

# गडचिरोली जिल्ह्यात पूरपरिस्थिती, जिल्हाधिकारी संजय दैने ऑनफिल्ड

**गडचिरोली । प्रतिनिधी**

जिल्ह्यात अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे कोणतीही हानी होवू नये व नागरिकांना त्रास होवू नये म्हणून जिल्हाधिकारी संजय दैने यांनी भरपावसात विविध ठिकाणी ऑनफिल्ड उपस्थित राहत प्रशासकीय यंत्रणेकडून आवश्यक उपाययोजना त्वरीत राबवून घेतल्या तसेच नागरिकांशी संवाद साधून त्यांना दक्षता घेण्याबाबत व मदतीबाबत आश्वस्त केले.

जिल्हाधिकारी दैने यांनी चांदाळा कुंभी, तसेच आरमोरी, वडसा, कुरखेडा तालुक्यात भेट दिली. त्यांनी यावेळी नागरिक व शाळकरी मुलांशी संवाद साधला. नागरिकांनी काळजी घ्यावी, पूलावर पाणी वाहत असतांना घाईगडबडीत पूल ओलांडू नये, विजा चमकत असतांना झाडाखाली उभे राहू नये, मानवी चुकांमुळे कोणतीही



जिवीत व वित्त हानी होवू नये याबाबत दक्षता घेण्याचे आवाहन केले. तसेच प्रशासकीय यंत्रणेला परिस्थितीवर बारीक नजर ठेवून अलर्ट राहण्याचे व नागरिकांना त्रास होणार नाही याबाबत आवश्यक उपाययोजना नियमितपणे राबविण्याचे निर्देश दिले.


जिल्ह्यात कालपासून तीन दिवसाठी अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला होता. तसेच गोसेखुर्द धरणातून मोठा विसर्ग सोडण्यात येणार असल्याची सूचना मिळाली होती. यासोबतच कालपासून अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात पूर सदृश परिस्थिती निर्माण होवून वाहतूकीचे अनेक मार्ग काही काळ बंद झाले, काही ठिकाणी नदीकाठच्या घरांमध्ये पाणी घुसले तर काही ठिकाणी रस्त्यावरील मुरूम व गिट्टी वाहून गेल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. याबाबत जिल्हाधिकारी यांनी त्वरीत दखल घेवून आज पाउस सुरू असतांनाच या भागांना भेट देवून पाहणी केली.यावेळी जिल्हाधिकारी संजय दैने यांचेसमवेत उपजिल्हाधिकारी विवेक साळुंखे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापनचे कृष्णा रेड्डी, निलेश तेलतुंबडे, संबंधीत तहसिलदार, पोलिस अधिकारी, राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एसडीआरएफ) व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन पथक, स्थानिक आपदा मित्र व नागरिक मदत कार्यासाठी उपस्थित होते.

# वर्षांपूर्वी उभारलेले टॉवर सुरु होणार तरी कधी?

**झडशी । वार्ताहर**

एक वर्षापासून मदणी येथे गावालगत गैवरव वंजारी यांच्या शेतात बी एस एन एल कंपनीचे मोबाईल टावर उभारण्यात आले मात्र एक वर्षाचा कालावधी लोटूनही मोबाईल टावर सुरू करण्यात न आल्याने ग्राहकांना व नागरिकांना टावर सुरू न झाल्याने रेंज अभावी मनस्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे येथील मोबाईल टावर ताबडतोब सुरू करण्यात यावे अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

आज मोबाईल सर्वांची दैनंदिन गरज झाली आहे व्यापारी कर्मचाऱ्यापासून तर शेतकरी शेतमजुरापर्यंत प्रत्येकाच्या हातात मोबाईल असतो मोबाईल शिवाय माणूस एक सेकंद सुद्धा राहू शकत नाही त्यामुळे ग्राहकांना उत्तम सेवा देण्याच्या नावाखाली मोबाईल कंपन्यांमध्ये सुद्धा स्पर्धा निर्माण झाली आहे मात्र असे असतानाही नजीकच्या मदणी येथे गेल्या एक वर्षापासून बीएसएनएल कंपनीचे मोबाईल टावर उभारण्यात आले आहे मात्र टावर अद्यापही सुरू न झाल्याने येथील ग्राहकांचे व नागरिकांचे महागडे मोबाईल टावर अभावी बंदच असल्याचे सांगण्यात येते टावर बंदच असल्याने शेतकरी शेतमजूर



शाळकरी विद्यार्थी मेटाकुटीस आले आहेत टावर सुरू न झाल्याने मोबाईल धारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे तसेच शासकीय निमशासकीय कार्यालयातील कर्मचारी महा-ई-सेवा केंद्र तसेच ऑनलाईन काम करणारे सर्व केंद्र चालक टावर अभावी त्रस्त झाले आहेत गावातील कोणत्याच भागात नेटवर्क नसल्यामुळे मोबाईल धारकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे बीएसएनएलचे टावर बंद असल्याने अनेक ग्राहक व नागरिक इतर कंपन्यांचे नेटवर्क मिळवण्यासाठी आपला मोबाईल नंबर पोर्ट करत आहे मात्र इतर कंपन्यांचे सुद्धा नेटवर्क मिळत नसल्याने ग्राहक कमालीचे त्रस्त झाले आहेत तेव्हा बीएसएनएल कंपनीने येथील नागरिकांची समस्या लक्षात घेता लवकरात लवकर आपले टावर सुरू करून येथील ग्राहकांना व नागरिकांना दर्जेदार सेवा द्यावी अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

परिसरातील गावात सर्वात जास्त जीवो, आयडिया, वोडफोन, ईरटेल, या कंपनीचे सिम कार्ड आहेत मात्र खाजगी कंपन्यांनी रिचार्जचे दर वाढविल्यामुळे मोबाईलधारकांचा कल बिएसएएनएलकडे वळला आहे बीएसएनएल कंपनीचे कमी दर व आकर्षक प्याकेजमुळे खाजगी दुरसंचार कंपन्या सोडून ग्राहक आता बीएसएनएलकडे आपलें मोबाईल नंबर पोर्ट करीत आहे तरी बीएसएनएल नी लवकर टॉवर सुरु करावे अशी मागणी होत आहे.

# आमदार होताच पंकजा मुंडे लागल्या कामाला

**बीड**–भाजपच्या राष्ट्रीय सचिव तथा नवनिर्वाचित विधान परिषद सदस्य आमदार पंकजा मुंडे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन परळी आणि बीड जिल्ह्यातील रेल्वेच्या समस्या त्यांच्या समोर मांडल्या. परळीतील जमीन अधिग्रहणासह जिल्ह्यातील रेल्वेविषयक प्रश्नांची लवकरच सोडवणूक करू असे आश्वासन त्यांनी दिले. जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांची देखील यावेळी उपस्थित होती.भाजपच्या कोअर कमिटीच्या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी केंद्रीय रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव गुरूवारी मुंबईत आले होते. भाजपच्या प्रदेश कार्यालयात आमदार पंकजा मुंडे, पालकमंत्री धनंजय मुंडे आणि परळीच्या शिष्टमंडळाने त्यांची भेट घेतली. परळी येथील रेल्वेच्या जमीन अधिग्रहणासह विविध मागण्यांचे निवेदन यावेळी त्यांना देण्यात आले. पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांनी सविस्तरपणे सगळे विषय त्यांचेसमोर मांडले.या सर्व मागण्यांवर योग्य तो



विचार करून परळी वैजनाथ, बीड येथील रेल्वेचे रखडलेले प्रश्न त्वरीत मार्गी लावण्यासाठी मी प्रयत्नशील आहे, असा विश्वास केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी या वेळी दिला. दरम्यान, या भेटीत सुरवातीला पंकजा मुंडे यांनी अश्विनी वैष्णव यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत निरोगी आणि उदंड दीर्घायुष्य लाभावे अशी सदिच्छा व्यक्त केली.

# तालुका काँग्रेस कमिटीची छल्लेवाडा गावाला भेट

**अहेरी । प्रतिनिधी**

तालुक्यातील लोकसंख्येच्या मानाने तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या छल्लेवाडा या गावात अहेरी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष डॉ. अब्दुल निसार हकीम यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने भेट देऊन समस्या जाणून घेतली.

छल्लेवाडा या गावात मागील अनेक वर्षापासून विविध समस्या उद्भवले आहेत.वेळोवेळी गाववासीयांकडून प्रशासनाला निवेदन देऊनही समस्या सुटत नसल्याने पायरी तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने गावात भेट देऊन विविध समस्या जाणून घेण्यात आले. यावेळी पहिल्यांदाच गावात कोणीतरी येऊन गावातील समस्या जाणून घेत असल्याने नागरिकांकडून आभार व्यक्त करण्यात आला. तर पहिली तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष डॉ. अब्दुल निसार हकीम यांनी विविध समस्या शासन दरबारी मांडणार असल्याचे सांगितले.

यावेळी अहेरी तालुका काँग्रेस कमिटीचे राम मुंजमकर,राघोबा गोरकर, गणेश उपलपवार, सत्यनारायण डोंगरे, श्याम कुंभारे,विनोद गरजेला ,दिवाकर आईलवर, रामचंद्र रामटेके तसेच ग्रामपंचायत सदस्य अशोक झाडे,बुज्जीताई तुर्रेम गावकरी मोबाईल,संतोष भगत, जितेंद्र झाडे, नवीन ताटपल्ली, राकेश आत्राम, बापू गोगुला,नामदेव सुधारी, सुरेखा भगत, लक्ष्मी कोंडा,अर्चना मुंजमकर, सपना आत्राम, मनीषा गोलेरी,देवका जोडे,नागेश गुरुजला, लक्ष्मण रामगुंडम, लक्ष्मी कोंडा कोचीबाई झाडे,कविता आत्राम आदी उपस्थित होते.



**काय आहेत समस्या**

छल्लेवाडा येथील अतिक्रमणधारकांना वन हक्क पट्टे मिळाले नाही. विविध लोक कल्याणकारी व शासकीय योजना पासून येथील नागरिक वंचित आहेत.रेपणपल्ली ग्रामपंचायत अंतर्गत समाविष्ट छल्लेवाडा गावाला स्वतंत्र ग्रामपंचायत दर्जा देणे. छल्लेवाडा नागरिकांना केवळ शेतीवरच अवलंबून राहाव लागते. त्यामुळे सिंचनाची सुविधा करून देणे. छल्लेवाडा गावाची लोकसंख्या लक्षात घेऊन गावात प्राथमिक आरोग्य केंद्राची निर्मिती करणे.गावात माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण उपलब्ध करून देणे. रेपनपल्ली - गुंडेरागावाजवळ प्रसिद्ध तीर्थक्षेत्र लखामेडा पर्यंत पक्का रस्ता मंजूर करणे व त्याचे डेव्हलपमेंट करणे.तसेच जोगनगुडा येथील पाण्याची समस्या दूर करणे.आदी समस्या गावकऱ्यांनी मांडली.

## वाघनखांसाठी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक

# मात्र ती खरी की खोटी याबाबत सोहळ्यातच खुलासा करावा, सुप्रिया सुळेंची मागणी

**मुंबई**–सरकारने वाघनखे खरी आहेत की खोटी याबाबतचा खुलासा साताऱ्यातील उद्घाटनाच्या कार्यक्रमात करावा, अशी मागणी राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. आज साताऱ्यात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वाघनखांचे प्रदर्शन होणार आहे. मात्र इतिहासकार इंद्रजीत सावंत यांनी लंडनहून येणारी वाघनखे खरे नसल्याचा दावा केला आहे. यावरूनच प्रसार माध्यमांशी बोलतांना सुप्रिया सुळे यांनी हे भाष्य केले आहे.

याबाबत प्रसार माध्यमांनी खासदार सुळे यांना प्रश्न विचारला असता त्या म्हणाल्या की, ''वाघनखांसाठी सरकारने प्रयत्न केल्याने त्यांचे त्यासाठी कौतुक आहे. पण इतिहासकार इंद्रजीत सावंत सारखे सांगत आहेत की, त्यांना म्युझियमकडून ही वाघनखे छत्रपती शिवरायांची असल्याचा कोणताही पुरावा नसल्याचे पत्र आल्याचे म्हटले आहे. त्यामुळे नक्की ही वाघनखे कुठून आली आहेत. ती खरी आहेत की नाही, हे समजत नाही. त्यामुळे महाराष्ट्र सरकारने किमान या कार्यक्रमात तरी खरे बोलावे आणि ही वाघनखे खरी आहेत की नाही, हे सांगावे'', अशी मागणी सुप्रिया सुळेंकडून करण्यात आली आहे.दरम्यान, पुढे त्या म्हणाल्या की, ''खुप अपेक्षेने लोक ही वाघनखे पाहण्यासाठी जाणार आहेत. लहान मुले, अनेक लोक इथे जाणार आहेत. त्याशिवाय शाळेतील मुलांना ही वाघनखे पाहता यावीत, यासाठी वेगळा वेळही ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे जर का मुलांना ही वाघनखे पाहता येणार असतील, तर सरकारने याबाबतचा खुलासा करावा. कारण जर का मुलांना खोटी वाघनखे दाखवण्यात येणार असतील, त्याचा मुलांवर काय परिणाम होईल?'', असा प्रश्न खासदार सुळेंनी उपस्थित केला आहे. तसेच, विधानसभा निवडणुका समोर ठेऊन काही तरी असे करण्यापेक्षा खरा इतिहास समोर सांगावा, असेही त्या म्हणाल्या आहेत.दरम्यान, इतिहासकार इंद्रजीत सावंत यांनी लंडनहून येणारी वाघनखे खरे नसल्याचा दावा केला आहे. त्यांना तसे पत्र लंडनच्या व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियमकडून आले आहे. महाराष्ट्रात आणण्यात आलेवी वाघनखे ही छत्रपती शिवाजी महाराजांची असल्याचा कोणताही पुरावा लंडनच्या व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियमकडे नाही, असे या म्युझियमकडून आलेल्या पत्रातून म्हटले आहे, असे इतिहासकार इंद्रजीत सावंत यांच्याकडून सांगण्यात आले आहे.छत्रपती शिवाजी महाराज यांची ऐतिहासिक वाघनखे गुरुवारी साताऱ्यात आणण्यात आली. ही वाघनखे लंडनवरुन मुंबईत आली होती. या वाघनखांचे आज शुक्रवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते अनावरण करण्यात येणार आहे. तर, ही वाघनखे साताऱ्यातील ज्या दालनात ठेवण्यात येणार आहेत, त्याचे उद्घाटन दुपारी १२.१५ वाजता करण्यात येणार असून शनिवारपासून नागरिकांना ती पाहता येणार आहेत.

# नितीन येरोजवार एमकेसीएल सुपर परफार्मन्स अवार्ड ने सन्मानित

**मूल । प्रतिनिधी**

चंद्रपूर येथे राजीव गांधी इंजिनिअरिंग कॉलेज मध्ये झालेल्या कार्यक्रमात मुल तालुक्यातील ३१ वर्षापासून विद्यार्थी व विद्यार्थिना उच्च दर्जाचे प्रशिक्षण देणारी नामांकित संस्था सक्सेस कंप्यूटर एज्युकेशन सेंटर मूल चे संचालक नितीन येरोजवार यांना चंद्रपूर येथे एमकेसीएल सुपर परफार्मन्स अवार्ड देऊन सम्मानित केले. त्या प्रसंगी एमकेसीएल मुंबई येथील जनरल मॅनेजर नटराज कटकधोंड, नागपूर विभागीय रिजनल मॅनेजर शशिकांत देशपांडे, रिजनल मॅनेजर कुंदन रामटेके, चंद्रपूर जिल्हा समन्वयक लक्ष्मीकांत कांबळे या कार्यक्रमाला हजर होते.




सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .